करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्षे 34 वे

www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०



आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण

साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल

संपर्क 9822058106

संदेश
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
करमाळा तालुक्यातील विविध घडामोडी तातडीने आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी साप्ताहिक संदेशच्या व्हॉटस् ॲप ग्रुपला जॉईन व्हा...
www.saptahiksandesh.com
9822058106



रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३१ | पाने-२० | दि.१६/८/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.


# तालुक्यात एक लाख वृक्षारोपण करणार

## १६ ऑगस्टला विक्रमी वृक्षारोपण - ३८ सेंकदात ४२७८ वृक्ष लागवड

करमाळा : जगताप गटाचे युवा नेते व खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभूराजे जगताप यांच्या संकल्पनेतून करमाळा तालुक्यात एक लाख वृक्षाची लागवड करण्यात येणार आहे. त्यानुसार १६ ऑगस्टला वृक्ष लागवडीचा पहिला टप्पा पुर्ण झाला आहे. यावेळी महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थी व मान्यवरांच्या उपस्थितीत ३८ सेंकदात ४२७८ वृक्षाची लागवड करून विक्रम केला आहे.

करमाळा तालुक्याच्या पर्यावरणाचा विचार करून श्री.जगताप यांनी ही संकल्पना राबवण्याचे ठरवले आहे. याकामी महात्मा गांधी विद्यालयाचे पाठबळ त्यांना मिळाले आहे. १६ ऑगस्टला सकाळी १० वाजता मौलालीमाळा वरील नळाच्या विहीरीच्या वरच्या बाजूला रिकाम्या मैदानात त्यांनी वृक्षारोपण करण्याचे ठरवले होते. त्यानुसार प्रमुख पाहुण्या म्हणून सहाय्यक आयुक्त वीणा पवार, मुख्याधिकारी सचिन तपासे यांच्यासह बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षिरसागर, वन अधिकारी श्री.नंदर्गे, ॲड.नवनाथ राखुंडे, जयदीप सरडे, शुभम बोराडे, सोमा पठाडे, रेखा परदेशी, ज्योतीराम ढाणे, विक्रम ढाणे, नोबल इंग्लिश स्कूलच्या संस्थापिका एलिझाबेथ आसादे, अनिल सुरवसे, रिलस्टार दीक्षा शिंदे, साहील मुलाणी, आफताब मुलानी, रियाज सय्यद, आकाश सिंधी, गुरू चव्हाण, अतुल देवकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत जागतीक विक्रम एका मिनीटात ३००० वृक्षरोपणाचा आहे. तो विक्रम येथे ३८ सेंकदात ४२७८ वृक्ष लावून मोडला आहे.





पर्यावरणाबाबत केवळ चर्चा करून भागणार नाही. त्यासाठी कृतीची गरज आहे. त्यामुळे करमाळा तालुक्यात एक लाख वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. १६ ऑगस्टला ४७०० वृक्षाची लागवड केली आहे. महात्मा गांधी विद्यालयातील चार हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच वृक्ष देवून ते वृक्षसंवर्धन करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी २० हजार वृक्ष दिले जाणार आहेत. याशिवाय करमाळा तालुक्यातील विविध गावात अन्य वृक्ष लागवड केली जाणार आहे. जी मंडळे अथवा सामाजिक संस्था वृक्षारोपण करणार असतील त्यांना वृक्ष मोफत देवून उर्वरीत वृक्षाची लागवड केली जाणार आहे.

**...शंभुराजे जगताप (चेअरमन- खरेदी विक्री संघ)**


# दत्तकला शिक्षण संस्था

Dattakala Shikshan Sanstha, Swami-Chincholi — तमसो मा ज्योतिर्गमय

Diploma, BE, ME, MBA, MCA, BBA, BCA, D.Pharm, B.Pharm, M.Pharm, School & Jr.College

गट नं.५४१/५२७, पुणे-सोलापूर हायवे लगत, स्वामी चिंचोली (भिगवण), ता.दौंड, जि.पुणे Web Site - www.dattakala.edu.in

(Approved by AICTE, PCI, New Delhi, DTE, MSBTE & Government of Maharastra)

ISO 9001 CERTIFIED | प्रवेश सुरू ! २०२४-२५ | NAAC ACCREDITED



प्रा.रामदास झोळ सर
संस्थापक-अध्यक्ष, दत्तकला शिक्षण संस्था

**दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी**
- D.Pharm PH6833
- B.Pharm PH6833
- M.Pharm PH6833

Pharmaceutics, Pharmaceutical Chemistry, Pharmaceutical Quality Assurance, Regulatory Affairs, Pharmacognosy)

**इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स ॲंड रिसर्च (फॉर गर्ल्स)**
- D.Pharm PH6914
- B.Pharm PH6914
- M.Pharm PH6914

Pharmaceutics, Pharmaceutical Quality Assurance, Regulatory Affairs

**अनुसया इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी**
- D.Pharm PH6892

**दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी केत्तुर, करमाळा**
- D.Pharm PH6977



**दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स**

**BE (DTE Code- EN6628)**
1) Civil Engg.
2) Computer Engg.
3) Electrical Engg.
4) Mechanical Engg.
5) Electronics & Computer Engg.
6) Information Technology

**ME (DTE Code- EN6628)**
1) Computer Engineering
2) Internet of Things
3) Machine Design
4) Electrical Engg.
5) Structural Engg.

**Diploma Engg. (DTE Code- D6628)**
1) Civil Engineering
2) Computer Engineering
3) Electrical Engineering
4) Electronics & Telecommunication Engineering
5) Information Technology
6) Mechanical Engineering

**MBA** (Master of Business Administration)
**MCA** (Master of Computer Application)
**BBA** (Bachelor of Business Administration)
**BCA** (Bachelor of Computer Applications)

**महत्वाची कागदपत्र**
१. एसएससी मार्कशीट २. एचएससी मार्कशीट
३ सीईटी स्कोर बोर्ड ४. अधिवास प्रमाणपत्र ५. जात प्रमाणपत्र
६. जात वैधता प्रमाणपत्र ७. शाळा सोडल्याचा दाखला
८. उत्पन्न प्रमाणपत्र ९. नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र

**सुविधा**
१) WiFi कॅम्पस २) अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग
३) मेस, कॅन्टीन व रात्रशाळेची सुविधा. ४) बस सुविधा.
५) सुसज्ज लायब्ररी ६) शॉप्स्, झेरॉक्स, हॉस्पिटल इ. सुविधा.
७) भव्या क्रिडा मैदान ८) ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट सुविधा.
९) मुला व मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची सुविधा कॅम्पसमध्येच उपलब्ध,



FOR MORE INFORMATION CONTACT :
9075680865 | 9561152724 | 9673002929 | 9922051144

कालानुरुप दर्जेदार शिक्षण देत संस्कृती जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न...

आपण काय करू शकतो याचे ज्ञान आले की आत्मविश्वासाने वाटचाल होवू शकते...!

## संपादकीय........................................!

# स्वत:ला ओळखा..!

एका भव्य अशा कार्यक्रमाला विविध प्रकारचे लोक आले होते. त्या कार्यक्रमाला मोठी गर्दी होती. विशेष म्हणजे पाऊस पडत होता. त्यामुळे बहुतेकांनी आपापल्या छत्र्या आणल्या होत्या आणि त्या बहुतेकांनी स्वत: जवळ ठेवल्या होत्या. याच कार्यक्रमाला ऑलम्पीक मधील गोल्डमेडल प्राप्त कुस्तीगीर हजर होता. त्याने त्याची छत्री बाहेरच्या बाजूला उलगडून ठेवली होती. त्यावर लिहिले होते, 'मी एक ऑलम्पीकचा कुस्ती चॅम्पीयन असून माझ्या छत्रीला कोणीही हात लावू नये अन्यथा संबधितांची गय केली जाणार नाही !' त्यामुळे तो कार्यक्रमात अत्यंत शांतपणे बसला होता. त्याला विश्वास होता की आपल्या छत्रीला कोणीच हात लावणार नाही. कार्यक्रम संपला व बाहेर आला तर त्याची छत्री ठेवलेल्या जागेवर नव्हती. त्याला तेथे एक चिठ्ठी सापडली. 'तू एक कुस्तीगीर आहे, पण मी वेगवान धावणारा धावपटू आहे.' कुस्तीगीर हातचोळीत पावसात भिजत घरी गेला.

या विनोदातील एक भाग महत्वाचा आहे, की कुस्तीगिराला त्याच्या शक्तीचा गर्व होता, तो गर्वहारण करण्यासाठी तो धावपटू त्याच्याबरोबर लढत बसला नाही. पण त्याला माहीत होते, जर या पैलवानाच्या तावडीत सापडलो तरच मार बसेल; पण आपण त्याला पळायला कधीच ऐकणार नाही. त्यामुळे तो बिनधिक्कत तेथे चिठ्ठी ठेवून छत्री घेऊन पळून गेला. धावपटूकडे धावण्याचे मर्म होते व ते त्याला माहित होते म्हणून तो ऑलम्पीक विजेत्याला आव्हान देवू शकला.

महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी अल्पश: मावळ्यांना बरोबर घेऊन आदिलशाही, मुघल, निजाम यांच्याबरोबर सामना करून हिंदवी स्वराज्य निर्माण केले. महाराजांना माहित होते, आपल्याकडे ज्या दऱ्याखोऱ्या , गड-किल्ले, नद्या-ओढे आहेत , हीच आपली बलस्थाने व मर्मस्थाने आहेत. शत्रूचे सैन्य मोजायला भरपूर असलेतरी त्यांना या ठिकाणी कसे लढयचे हे त्यांना माहित नाही. याच जोरावर महाराजांनी अनेक लढाया जिंकत जिंकत राज्य उभे केले. इराण, इराक, अफगाण, सौदी आरेबीया ही जगातली छोटी छोटी राज्ये आहेत. पण त्यांनी जगात आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे. त्याचे कारण म्हणजे त्यांना माहित आहे की, आपल्याकडे जे तेलाचे साठे आहेत हे आपले बलस्थान आहे. त्या जोरावर या छोट्या-छोट्या राष्ट्रांनी आमेरिकेसारख्या देशाला सुध्दा झुंजवले आहे.

एक शेतकरी होता. त्याची शेती गावाला खेटून होती. कोणतेही पीक केलेतरी जनावरांचा, माणसांचा त्रास होत असे. त्यामुळे त्यातील निम्मेपीक सुध्दा त्याच्या घरी येत नव्हते. तो वैतागून गेला, उपासमारीची वेळ आली. त्याचा मोठा मुलगा शहरात शिकण्यास गेला होता. त्याला शहरात गेल्यावर शहराजवळच्या जागेचे मुल्य कळाले होते. त्याने वडीलांना सांगितले आपण खूप श्रीमंत आहोत, दु:खी होऊ नका. त्याने रस्त्याकडे तोंड करून शॉपींग सेंटर बांधले. त्याला वडीलांचे नाव दिले. त्यातील अनेक गाळे भाड्याने दिले, महत्वाचे दोन गाळे स्वत:साठी ठेवले. त्यात शेतीपुरक व्यापाराचे दुकान टाकले. शेतातील वर्षभराचे उत्पन्न गाळ्याच्या भाड्यातून त्यांना एकाच महिन्यात मिळू लागले. शिवाय शेताला तटबंदी झाली. पीकाचे संरक्षण होऊ लागले आणि गावात त्या कुंटूबांचा सन्मान वाढला.

ज्यांना आपल्याकडे काय आहे, याचे भान असल्यानंतर व त्याचा योग्यवेळी वापर करण्याचे ज्ञान असल्यानंतर त्या परिवाराची प्रगती होण्यास वेळ लागत नाही. आपण भिमा व सिना या दोन नद्यांच्यामध्ये आहोत. आपला करमाळा तालुका उजनी व कोळगाव प्रकल्पामुळे समृध्द होवू शकतो. मुळत: आपला तालुका सोलापूर, नगर, बीड, उस्मानाबाद व पुणे या पाच जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. दळणवळणासाठी मध्यवर्ती असलेला हा तालुका आहे. या तालुक्यात जिंती, पारेवाडी, वाशिंबे, पोफळज, जेऊर, भाळवणी व केम या गावांसाठी रेल्वेची सुविधा आहे. लातूर-पुणे राज्यमार्गाची निर्मिती याच तालुक्यातून होत आहे. इंदौर-हैद्राबाद असा मार्ग याच तालुक्यातून जातो. आशिया खंडातील सर्वात मोठा सीना-भीमा बोगदा हा याच तालुक्यात आले. या तालुक्यातील उजनीच्या उचल पाण्यावर ४५ हजार एकर, कुकडीखाली ४५ हजार एकर जमीन ओलीताखाली येऊ शकते. दहीगाव उपसा सिंचनखाली २५ हजार एकर क्षेत्र, कोळगाव प्रकल्पाखाली १० हजार एकर क्षेत्र, तालुक्यातील छोट्या तलावातून जवळपास १० हजार एकर क्षेत्र ओलीताखाली येते. या तालुक्यातील ९५ टक्के क्षेत्र ओलीताखाली येवू शकते व हे आपले बलस्थान आहे, पण गेली २५ वर्षे याच प्रकल्पावर राजकारण केले जाते. सत्ता हस्तगत केल्या जातात; पण ही बलस्थाने मजबूत केली जात नाहीत. राज्यात तळेगाव -दाभाडे येथे हरीतगृह असलेली एकमेव औद्योगीक वसाहत आहे. टेंभुर्णी ते जेऊर या टप्प्यात जर अशी वसाहत उभी राहिली अथवा ५० शेतकऱ्यांनी एकत्र येवून प्रत्येकी २० आर चे एक पॉलीहाऊस उभे करून २५ ते ३० एकर क्षेत्राचा विकास केला तर तालुक्यात शासनाला लवकरच जेऊर परिसरात विमानतळ उभे करावे लागेल. इस्त्राईलला पाणी टंचाई आहे. डिझेलचा भाव पाण्याला आहे, पण त्यांनी योग्य नियोजन करून शेतीचे संयोजन केले व जगात जास्त उत्पन्न मिळवण्याचे तंत्रज्ञान विकसीत करून प्रचंड उत्पन्न मिळवले आहे. त्याच धर्तीवर सांगोला तालुक्यात पाणी टंचाई आहे. तेथे कमी पाण्यावरील डाळींब उत्पादन हा प्रयोग यशस्वी केला आहे. त्या बरोबरच तेथे सूत गिरणी, साखर कारखाना, रेडीमेड कपडे, डाळींबा वरील प्रक्रिया, बेदाणा प्रकल्प असे वेगवेगळे प्रकल्प उभे करून ते यशस्वी झाले आहेत. आपल्या तालुक्यात ऊस व साखर कारखानदारी यावर भर आहे. चार साखर कारखाने आहेत, पण तसे पाहता हे चारही कारखाने सक्षम दिसत नाहीत. आदिनाथ भाड्याने देण्यावरून मोठा वादंग झाला आहे. मकाईकडून ऊस ऊत्पादकाला तब्बल दीड वर्षे बीलाची प्रतिक्षा करावी लागली. कमलाई व भैरवनाथ यांच्याकडूनही वेळेवर बीले मिळत नाही. थोडक्यात साखर कारखानदारी हा उपक्रम पाहिजे तसा जोमात नाही उलट कोमात आहे. त्यामुळे आपण नेमके कोणत्या गावात आहोत, आपण काय करू शकतो.. याचा आता प्रत्येक शेतकऱ्याच्या मुलाने विचार केला पाहिजे. त्यानुसार शेतीपुरक व्यवसाय, दुग्धजन्य पदार्थ, तेल उत्पादन, निर्यात, पर्यटन, कृषी पर्यटन, हॉटेलींग उभे करून सोशल मिडीयाच्या माध्यमातून आपली जगाला वेगळी ओळख करून देण्याचे ठरवले पाहिजे. विशेष म्हणजे प्रत्येकांने स्वत:चा विकास स्वत: केला पाहिजे. कंदर येथील दादासाहेब पाटील, रंगनाथ शिंदे, किरण डोके यांनी केळी व्यापारात तसेच शेटफळ येथील लोकविकास संस्थेने केलेले प्रयोग महत्वाचे आहेत. वाशिंबे येथील अभियंता अभिजीत पाटील यांनी केळी उत्पादनात केलेली प्रगती.. अशी आणखी काही उदाहरणे आहेत, की जी व्यक्तीगत प्रयत्नाच्या जोरावर यश मिळवल्याची आहेत. शासनावर अवलंबून राहिलेतर प्रगती होईलच असे नाही. मांगी रस्त्यावरील औद्योगिक वसाहत गेल्या २७ वर्षात जैसे थे आहे. त्यामुळे शासनापेक्षा आपल्याकडे काय आहे व आपण काय करू शकतो, याचा विचार करून तो प्रयोग यशस्वी करण्याची गरज आहे.

अलिकडे बागायत भागातील शेतकऱ्याकडे विशेषत: जादा ऊस व केळी आसणाऱ्या शेतकऱ्याकडे मोठ्या प्रमाणात पैसा आलेला आहे. हा पैसा बंगला, गाडी, जमीन, सोने यात गुंतवणूक करण्यापेक्षा दूरदृष्टी ठेवून नवीन प्रयोग केलेतर तो तालुका विकासासाठी उत्तम पर्याय होऊ शकतो. थोडक्यात आपल्या तालुक्याला निसर्गाने भरभरून दिले आहे, त्याचा अभ्यास करून नवे विचार-नवे पर्याय निर्माण केले पाहिजेत. त्यासाठी स्वत:ला ओळखा व कार्याला लागा हीच अपेक्षा...!

## लाखात एक..!



"जो आवडतो सर्वांना.., तोचि आवडे देवाला ।" या उक्तीप्रमाणे भाऊ तू ही सर्वांचाच लाडका होता, तोच आज देवालाही आवडला. एका आई-बापा पोटी जन्म घेतलेले आपण तिघे बहिण-भावंडे. लहानपणी खेळलेले खेळ, दंगामस्ती, खोड्या, सुट्टीत मिळून मामाच्या गावी गेलेलो.. सगळं चित्र आज डोळ्यासमोर उभे रहाते आहे. आपल्या नानांच वय झालेलं, त्यात आईही गेली, आम्ही सर्वांनीच तुझा आधार केला पण आज तोच आधार आमचा हिरावून घेतला गेला. कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी डोळ्यासमोर चेहरा येतो तो तुझाच भाऊ ! बहिणींवर प्रेम करणारा भाऊ तुझी खूप-खूप आठवण येते. भावाएवढं प्रेम आयुष्यात कोणच करत नाही. आपल्या बहिणी सुखक्ष असाव्यात, हे त्याचं स्वप्नं असतं. ते स्वप्नही तू पूर्ण केलंस. आम्ही दोघी बहिणी सुखी आनंदी बघून तुला खूप आनंद व्हायचा. आपले नाना, सोनाली, मयुरी, मनिष, मकरंद, वहिनी, आम्ही बहिणी या सर्वांनाच सोडून तू लांब गेलास रेऽऽ भाऊ !
"मायेचा उबदार किनारा, असतो तो भाऊ
जगण्याची अखेरपर्यंत, हिम्मत देतो तो भाऊ"
प्रत्येक राखीपौर्णिमेला तु आमच्याकडे यायचास. भाऊबीजेला आम्हाला बोलवायचास. आपण सर्वजण आनंदाने सण साजरे करायचो. अरे गेल्यावेळी तु आई आजारी, हॉस्पिटलमध्ये असताना म्हणाला की, नुसती आज राखी बांध. आई बरी झाली की पुढच्या वर्षी ओवाळून राखी बांधू. पण आज तुच आम्हाला सोडून गेलास. आम्ही राखी तुला कुठे बांधायची..! आज भावाचा उपवास, आठवण काढताच डोळ्याला धारा लागतात. हसत-खेळत संसारातून तू दूर गेलास. सर्वांनाच चटका लावून गेलास. आजही नातेवाईक, तुझे मित्रमंडळी, शेजारी-पाजारी सर्वच तुझी आठवण काढतात. तुझ्या आठवणीने त्यांच्याही डोळ्यात पाणी येते. सर्वांचाच तु लाडका होता. लाखात एक असा आइचा श्यामच होता.

आईची खूप-खूप सेवा केली. कधी दुखावले नाही. चिडणे हे तर तुझ्या स्वभावातच नव्हते. पण देवच असा कसा निष्ठूर झाला की त्याने आमच्या सोन्यासारख्या भावाला आमच्या पासून खूप दुर नेले की कोणी काहीच करू शकत नाही. परतुनही आणू शकत नाही.

लहानपणी बहिण-भावाचे नाते जितके घट्ट असते तितके ते मोठ्याणी नसते असे म्हणतात. परंतु आमच्या बाबतीत असे नव्हते. मोठेपणीही नाते घट्टच राहिले. आपल्याला मुले, नातवंडे झाली तरी तेच प्रेम, माया काहीच कमी झाले नाही. तु कितीही मोठ्या पदावर गेला तरी आम्हा बहिणींना विसरला नाही. तुझ्यासारखा भाऊ मिळायला नशीबच लागत. आम्ही रतन, शोभा तुझ्या बहिणी. आम्हाला असे वाटते की असा आमचा भाऊ कुठून तरी धावत यावा. वेड्या बहिणींची वेडी ही माया.., डोळ्यातून वाहतात फक्त आश्रु आणि आश्रूच...!

**...सौ.शोभा शांतीलाल मोरे (फुके)**
**नातेपुते ता.माळशिरस**

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


सर्व ग्राहकांना
रक्षाबंधन
निमित आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा..!
ओंकार ज्वेलर्स
गुजर गल्ली, करमाळा Mo.9921316955
ओंकार गोल्ड पॅलेस
मेनरोड, भंडारे हॉस्पीटल शेजारी, करमाळा, जि. सोलापूर
Mo.7798535353/8379027471


॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥
आमचे वडील
कै.प्रकाश(भाऊ) गुरूलिंग झाडबुके
यांचे द्वितीय पुण्यस्मरण मिती श्रावण शु.॥१२॥ द्वादशी शके १९४६
शनिवार दि.१७/८/२०२४ रोजी दुपारी १२ वा. करण्याचे योजिले आहे
जशी वेळ निघून जाईल, तशी जखम सुध्दा भरून येईल
पण आयुष्यभर येणाऱ्या त्यांच्या आठवणींना कुठलीच तोड नाही
त्यांच्या आठवणींचे झरे इतके की.., साखरही गोड नाही
द्वितीय पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!
आपले नम्र
श्रीमती शोभा प्रकाश झाडबुके(पत्नी)
श्री.बाळासाहेब प्रकाश झाडबुके(मुलगा), श्री.प्रितम प्रकाश झाडबुके (मुलगा)
सौ.भाग्यश्री प्रितम झाडबुके(सून), चि.शंभु प्रितम झाडबुके(नातू)
स्थळ : घोलपनगर, करमाळा., जि.सोलापूर


भावपूर्ण
श्रध्दांजली
स्व.सुमित ढाळे
(मृत्यू दि.१२/८/२०२४)
तो हसरा चेहरा, नाही कोणाला दुखावले
मनाचा तो भोळेपणा, कधी नाही केला मोठेपणा
उडूनी गेला अचानक प्राण, पुनर्जन्म घ्यावा ही
आमची कमलाभवानी चरणी प्रार्थना !
वेताळपेठ येथील रहिवाशी स्व.सुमित ढाळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो; हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !
दशक्रिया विधी : बुधवार दि.२१/८/२०२४ रोजी सकाळी
सातनळाची विहिर (जुना डाकबंगला), करमाळा येथे होणार आहे.
शोकाकुल
श्री गजानन सोशल अॅन्ड स्पोर्टस् क्लब वेताळपेठ, करमाळा.,

शुध्द.. स्वच्छ.. स्वादिष्ट.. नी रुचकर..
चिवटे उपहारगृह
शुध्द शाकाहारी
नाष्ट्याची उत्तम सोय
साऊथ इंडियन : इडली सांबर, उडीदवडा, उत्तप्पा, डोसा
नमकीन : फरसाण, शेव, स्पेशल चिवडा, पापडी
नाष्टा : पुरीभाजी, मिसळपाव, पोहे/उपमा, दहिवडा/शिरा
स्वीट : पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली
चाट : पाणीपुरी, स्पेशल भेळ, रगडा पॅटीस, राज कचोरी
डेअरी : दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
कोल्ड्रींक्स : कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम
उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या !
पत्ता : राशिनपेठ, करमाळा.
मो.८८८८१४७००५

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

## श्रीराम मंदिरात ब्राह्मण समाजाच्या वतीने श्रावणी कार्यक्रम संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील श्रीराम मंदिरात ब्राह्मण समाजाच्या वतीने श्रावणी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सर्व ब्राह्मणवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. पौरोहित्य बार्शी येथील परांजपे गुरूजी यांनी केले. यावेळी ब्रह्मवृंदांना श्रीधरपंत सुर्यपुजारी यांचे वतीने दूधाचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्रह्मवृंद संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## नंदन प्रतिष्ठान गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी रोहित कोळेकर

करमाळा(सं.प्र.) : नंदन प्रतिष्ठान गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी रोहित कोळेकर यांची तर उपाध्यक्ष पदी तुषार बुरडे यांची निवड करण्यात आली आहे.

गेल्या तीन-चार वर्षापासून नंदन प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. या दरम्यान अनेक समाजपयोगी कार्यक्रम घेतले जातात. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा शहर सरचिटणीस जितेश कटारिया यांचे अध्यक्षतेखाली व मावळते अध्यक्ष नितीन व्हटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंडळाच्या अध्यक्ष पदी रोहित कोळेकर यांची निवड करण्यात आली. तसेच श्रीच्या प्रतिष्ठापना मिरवणुक प्रमुख पदी सचिन चव्हाण आणि विसर्जन मिरवणूक प्रमुख पदी महेश क्षीरसागर यांची देखील निवड करण्यात आली. यावेळी गणेशोत्सव दरम्यान घेतले जाणाऱ्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीस प्रतिष्ठानचे मार्गदर्शक प्रकाश क्षीरसागर, अमोल रोकडे, बाळासाहेब वाघ, पंकज परदेशी यांच्यासह निलेश माने, डॉ.सतीश गोयेकर, सचिन चव्हाण, अक्षय परदेशी, दिपक देवकर उपस्थित होते.

## १९ ऑगस्टला श्री खोलेश्वर महादेव मंदिराचा रथ उत्सव



करमाळा(सं.प्र.) : दरवर्षी प्रमाणे श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी (ता.१९) किल्लावेस येथील श्री खोलेश्वर महादेव मंदिराचा रथ उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता किल्लावेस येथून रथाची सवाद्य मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. तरी यावेळी सर्व भाविकभक्तांनी उपस्थित रहावे; असे आवाहन आयोजकांनी केले

## जातेगाव येथे गुणवंतांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून अमर वसंत ननवरे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी व स्मिता प्रविण शिंदे यांची पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल या दोघांचा सत्कार जातेगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त पोलीस पाटील गोरख धुमाळ यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्तात्रय माने हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून एपीआय रोहित शिंदे, पीएसआय संदिपान बनकर, सामाजिक कार्यकर्ते सुजित बागल आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच लक्ष्मण माने, काशिनाथ कामठे, मच्छिंद्र धुमाळ, यशवंत शिंदे, प्रकाश पाटील, सुभाष पवार, जातेगाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुनील शिंदे, तुषार शिंदे तसेच सर्व ग्रामपंचाय सदस्य व महिला उपस्थित होत्या. प्रास्ताविक महादेव शिंदे यांनी केले तर सुत्रसंचालन घुले सर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रविण शिंदे यांनी मानले.

WASHIMBEKAR
Saraf & Son's
रक्षाबंधन हार्दिक शुभेच्छा
वाशिंबेकर
सराफ ॲन्ड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५१००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट
उपवासाचे पदार्थ
रेडिमेड स्नॅक्स
• खजुर (लाल व काळी)
• सिडलेस खजुर (लाल व काळी)
• राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
• गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
• गुलकंद राजगिरा वडी व रोल
• नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
• केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
• बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
• बटाटा चिलीमिली
• बटाटा चिवडा (गोड व तिखट)
• राजगिरा लाही
• गावरान खारे शेंगदाणे
• भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
• तिखट शेंगदाणे
• लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
• उपवास शाबुदाणा खाकरा
• उपवासाचे गोड लिंबू लोणचे
• शेंगतेल
• शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
• शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
• इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
• पॅकींग सायकल भगर
• राजगिरा इ.
काटदरे उपवास पीठ
• राजगिरा पीठ
• उपवास भाजणी पीठ
• शिंगाडा पीठ
• सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)
[illegible]
• बटाटा पापड
• बटाटा - भगर पापड
• बटाटा व शाबुदाणा
• रंगीत पापडी
• शाबुदाणा पापडी
• बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
• बटाटा खिस
• बटाटा शेव, बटाटा स्क्रु
• शाबुदाणा बॉबी
* टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
। मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॅ
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# सावड फेडा...



● प्रासंगिक ●

सोलापूर जिल्ह्यातील सभा गाजवणारा नेता कोण ? असे विचारले तर पहिले नाव माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे येते. प्रत्येक निवडणुकीमध्ये श्री.जगताप यांचे सभेला प्रचंड गर्दी असते. या सभेत भाऊ काय बोलणार ? कोणाला अंगावर घेणार ? आणि कोणत्या विषयाला हात घालणार ? याची उत्सुकता असते. काही दिवसांपूर्वी माजी आमदार

जयवंतराव जगताप यांनी विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सत्कार केला. यावेळी माजी आमदार नारायण(आबा) पाटील आणि इतर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यानंतर कर्मयोगी गोविंदबापू पाटील यांच्या पुण्यस्मरणाच्या कार्यक्रमातही श्री.जगताप उपस्थित होते. अलिकडे महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींशी त्यांचा संपर्क वाढलेला आहे. अर्थातच अनेकांच्या समोर असा प्रश्न निर्माण झाला की.. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे व श्री.जगताप यांच्यात काही बेबनाव निर्माण झाला काय ? अशा स्थितीत गेल्या आठवड्यात आवाटी येथे महावितरण उपकेंद्राच्या कार्यक्रम प्रसंगी श्री.जगताप आणि आमदार शिंदे एकत्र येणार हे समजले. त्यामुळे या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली. विशेष म्हणजे श्री.जगताप काय बोलणार.. याकडे सर्वांचे लक्ष वेधले होते.

यावेळी श्री.जगताप यांनी नेहमीच्या पध्दतीने जोरदार बॅटींग केली. बोलताना ते म्हणाले.. "आमच्या वडीलांपासून आम्हाला एक आजार आहे. तो म्हणजे खरं बोलणे, तोंडावर बोलणे व त्या आजाराचा मोठा फटका बसला आहे. अनेकांनी शांत बसण्याचा सल्ला दिला. पण तो आम्हाला मानवत नाही आणि तो सल्ला पाळलाही जाणार नाही. कारण सर्व सुटते पण सवय सुटत नाही. आता यावेळी बऱ्याच गोष्टी स्पष्ट बोलाव्या लागत आहेत. मामा (आमदार संजयमामा शिंदे) यावेळी आता तुम्हाला सावड फेडावी लागणार आहे. गेल्यावेळी मी तुमच्यासाठी विधानसभेला थांबलो होतो. यावेळी तुम्हाला आणि इतरांना माझी सावड फेडावी लागणार आहे..!"

जगताप गट हा राजकर्त्यांची नर्सरी आहे. माजी आमदार व मंत्री कै.दिगंबरराव बागल किंवा माजी आमदार नारायण (आबा) पाटील हे आमच्याच तालमीतील पैलवान. त्यांना आत्तापर्यंत पुढे आणले. आता यावेळी मामा, बागल गट तसेच पाटील गट यांनी आमची सावड फेडावी व विधानसभेला पाठबळ द्यावे; अशा शब्दात श्री.जगताप यांनी विधानसभेसाठी आपली उमेदवारी अप्रत्यक्ष घोषित केली आहे. यावेळी श्री.जगताप यांनी मोजक्या शब्दात सर्वच नेत्यांचा उत्तमरित्या समाचार घेऊन ही सभा गाजवली. एवढेच नाहीतर जगताप गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण होईल; असे वक्तव्य करून सर्वच नेत्यांना सावड फेडण्याचे आवाहन केले.

***

## राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) संघटना उपाध्यक्ष पदी बाबासाहेब चव्हाण

करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) संघटना म.राज्य च्या उपाध्यक्ष पदी पिंपळवाडी येथील बाबासाहेब गोकुळ चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.जी.संजीवा रेड्डी यांचे आदेशानुसार व अध्यक्ष डॉ.कैलास कदम यांचे पत्रान्वये चव्हाण यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर चव्हाण यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना चव्हाण यांनी संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या न्याय हक्कासाठी व संघटना वाढीसाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

## सुमित ढाळे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील रहिवासी सुमित ढाळे (वय-३५) यांचे अल्पशा आजाराने १२ ऑगस्ट रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास निधन झाले. त्यांचे मागे तीन मुले, पत्नी व आई असा परिवार आहे. त्यांचे निधनानंतर अनेक सराफ व्यापारी तसेच नागरीकांनी दु:ख व्यक्त केले. करमाळा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे यांचे ते चुलतबंधू होते. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

## कंदर येथील गौरीहर सरडे यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : कंदर येथील गौरीहर रामदास सरडे (वय-६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सरडे व माजी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संपतराव सरडे यांचे ते बंधू होते.

## प्रफुल्ल शिंदे यांचेकडून दत्त मंदिरास एलईडी बोर्ड भेट

करमाळा(सं.प्र.) : किल्ला विभाग येथील दत्त मंदिरास व्यावसायिक प्रफुल्ल शिंदे यांनी नामफलक असलेला एलईडी बोर्ड अर्पण केला. यावेळी जगताप गटाचे युवा नेते व बाजार समितीचे संचालक शंभुराजे जगताप व किल्ला विभागातील नागरीक उपस्थित होते.




Skill India
कौशल भारत-कुशल भारत
SWARAJYA SDI
महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत विविध कोर्सेस..
मोफत प्रशिक्षण
महिला / युवक - युवती / बेरोजगारांसाठी
कौशल्य विकास प्रशिक्षणातुन नोकरी / स्वयंरोजगाराची संधी..!

| कोर्स | 8 वी,10 वी 12 वी ते ग्रॅज्युवेट |
|---|---|
| फॅशन डिझायनर | टेलरिंग & क्लॉथ कटिंग, ब्लाऊज & ड्रेस डिजाईनिंग |
| मल्टी स्किल फुड प्रोसिंग | फुड प्रोसिंग पदार्थ तयार करणे. |
| डिजिटल मार्केटिंग मॅनेजर | बेसिक कॉम्प्युटर कोर्स & सोशल मीडिया मार्केटिंग |



आवश्यक कागदपत्रे :- आधार कार्ड झेरॉक्स (कलर), शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईट, जातीचा दाखला, दोन फोटो.
स्वराज्य स्किल डेव्हलोपमेंट इन्स्टिटयूट
S T स्टॅन्ड समोर, पवार हॉस्पिटल शेजारी, करमाळा
संपर्क :- 9665789393

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत




त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904


भाऊ-बहिणींचे अतुट नाते
रेशमी धाग्यांनी विणणारा सण..
रक्षाबंधन
च्या
हार्दिक शुभेच्छा !
सोनी
ज्वेलर्स
आकर्षक व सुबक
सोने-चांदीचे
दागिणे मिळण्याचे
सुवर्णदालन !
आकर्षक व शुध्द
चांदीचे जोडवे व भांडी मिळतील
916 हॉलमार्क सोने-चांदी
व राशी खड्यांचे व्यापारी
● रवि सोनी 9421029869
● अजित सोनी 9423336932
● पत्ता : मेनरोड, करमाळा
जि.सोलापूर
'संगणक ऑपरेटर' पाहिजे. गरजूंनी संपर्क साधावा !


काही नाती खुप अनमोल असतात.
रक्षाबंधन
निमित्त हार्दिक शुभेच्छा.
महावीर
ज्वेलर्स
सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. +91 84849 48488 | +91 99221 22199
प्रोप्रा : अमित अनिल सोळंकी


16
ऑगस्ट
ज्ञानम परम बलम्
निरोगी आयुष्याने तुम्हाला वाढवावं..,
आणि सुख-शांतीने सजवावं..,
अडचणींचे डोंगर पार करूनी..,
यश शिखरावर तुम्ही पोहचावं..!
करमाळा भूषण
दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेचे चेअरमन, माजी नगरसेवक
श्री गिरधरदासजी देवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष
श्री.कन्हैयालाल गिरधरदास देवी
यांना वाढदिवसाच्या खूप.. खूप..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
नवभारत इंग्लीश मेडियम
स्कुल व ट्विंक्लींग स्टार्स, करमाळा.
संचालक : श्री.अमोद संचेती, श्री.चंद्रकांत देवी, श्री.विजय दोशी, सौ.सुनिता देवी
मुख्याध्यापिका - सौ.सुनिता मोहिते, सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी वृंद

# 'दक्ष' स्वामी विवेकानंद पतसंस्था



मी सन २००३ साली स्वामी विवेकानंद पतसंस्थेत क्लार्क या पदावर रुजू झालो. संस्थेचे संचालक मंडळ अतिशय नियोजनबध्द संस्थेचा कारभार करत आहेत. संस्थेचे चेअरमन नागेश झांजुर्णे, व्हा.चेअरमन श्रीमती वनिता निर्मळ व सचिव प्रशांत पाथुडकर हे संस्थेच्या प्रत्येक कामाबाबत अतिशय दक्ष असतात. त्यांचे अंतर्गत कामकाजावरती नियंत्रण असते. तसेच कोणत्याही कामात काटकसर, नियोजन व पारदर्शक कारभार करण्यावर त्यांचा भर असतो. आम्हीही कर्मचारी सभासदांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करतो. तात्काळ सेवा देण्यास आम्ही प्राथमिकता देतो. सर्व संचालक मंडळ नि:स्वार्थी भावनेने काम करत आहेत. म्हणूनच आज आपण २५ व्या वर्षात पर्दापण करत आहोत. आपण एखाद्या फळाचे झाड लावलेतर त्याला फळे लागेपर्यंत किती कष्ट करावे लागते, हे आपल्याला माहितच आहे.

'इवलेसे रोप लाविले, त्याचा वेलु गेला गगणापरी..' या म्हणीप्रमाणे आपण आज या वटवृक्षाची फळे चाखत आहोत. स्वामी विवेकानंद पतसंस्था, स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय मंडळ व स्वामी विवेकानंद वाचनालय हा मोठा परिवार आहे. म्हणून त्यांच्यासाठी कविता..

स्वामी विवेकानंद  
एक परिवार आहे  
संचालक मंडळ त्या परिवाराचे  
आई-बाप आहे  
सामाजिक सेवा करणे  
या परिवाराचे काम आहे  
स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय मंडळ  
स्वामी विवेकानंद पतसंस्था  
व स्वामी विवेकानंद वाचनालय  
या परिवाराची लेकरे आहेत  
शारदीय नवरात्र उत्सव साजरा करणे  
स्वामी विवेकानंद मंडळाचे कार्य आहे  
दुर्गादेवी मंदिर बांधणे  
त्यांच्या कार्याचे फळ आहे  
लोकांच्या ठेवीचे संरक्षण




व गरजूंना अर्थसाह्य करणे  
स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे कार्य आहे  
संस्था कार्यालय, सभागृह बांधणे  
व सभासदांचा विकास करणे  
हे त्यांच्या कार्याचे फळ आहे  
गरजू विद्यार्थ्यांना ज्ञान देणे  
स्वामी विवेकानंद वाचनालयाचे काम आहे  
मुलांना नोकरी लागणे हे  
त्यांच्या कार्याचे फळ आहे  
स्वामी विवेकानंद परिवाराचा  
ध्यास आहे.. त्यांच्या ध्यासातच  
समाजाचा विकास आहे

अशा या स्वामी विवेकानंद परिवारातील प्रत्येक सदस्याला २५ व्या रौप्यमहोत्सवा निमित्त त्यांच्या कार्याला माझा मानाचा मुजरा आहे..!



***

**...मधुकर साबळे**  
**(व्यवस्थापक)**




सन २०२२-२३ ते २०२७-२८ साठी बिनविरोध निवड झालेले पतसंस्थेचे संचालक मंडळ



प्रसिध्द दिग्दर्शक श्री.नागराज मंजुळे यांनी पतसंस्थेस सदीच्छा भेट दिली. त्याप्रसंगी स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ व कर्मचारी वृंद








# नवरात्र उत्सवातून स्थापन झालेली पतसंस्था



साधारणत: सन १९९० साली जेऊर येथे काळामारूती चौक या ठिकाणी आमच्या गल्लीतील ज्येष्ठ नागरीक व माजी सरपंच दत्तात्रय ज्ञानदेव निर्मळ यांचे नेतृत्वाखाली वामनभाऊ गोफणे, भास्करभाऊ कांडेकर, विठ्ठल रासकर, भारत किरवे या मंडळींनी नवरात्र उत्सव मुर्तीची स्थापना केली. पुढे या मंडळींनी त्याची धूरा आम्हा सर्व मित्रांवरती सोपवली. त्यातून कै.अशोक नाना निर्मळ यांचे नेतृत्वाखाली संजूशेठ गादीया, प्रशांत पाथुडकर, नागेश झांजुर्णे, संजय भोसले, प्रदीप घोलप, मोहन पिसे, राजेंद्र जाधव, किशोर कदम, विठ्ठल गावडे, गणपत पिसे यांनी स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय मंडळ स्थापन केले. दरवर्षी नवरात्र उत्सव उत्साहात साजरा करत होतो. पुढे भाविक भक्तांच्या प्रेमातून मंडळाला सढळ हाताने देणगी मिळत गेली व आम्ही सहकाऱ्यांनी विविध कार्यक्रम करून देणगी जमा केली.

देणगी रक्कम भरपूर झाल्यामुळे सदर रक्कम कुठे गुंतवणूक करावी; या विचारात असताना आम्हांस आपलीच पतसंस्था स्थापन करण्याची कल्पना सुचली. कै.अशोक नाना निर्मळ यांचे नेतृत्वाखाली दि.१५ ऑगस्ट २००० रोजी पतसंस्था स्थापन केली. एका भाड्याच्या जागेत अवघे २५०००/- भागभांडवल गोळा करून स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था चालू केली. जेऊर व जेऊर कार्यक्षेत्रातील गरजू, गरीब,




होतकरू, सुशिक्षित बेकार तरूणांना व्यवसायासाठी कर्ज वाटप करून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला.

आज रोजी संस्थेने स्वत:च्या मालकीच्या ९.११ गुंठे जागेत सुसज्ज संस्था कार्यालय व सभागृहाची निर्मिती केली. आज आपली पतसंस्था ४० लाख रूपये भागभांडवल जमा करून भरभक्कम स्थितीत वाटचाल करत आहे. अशातच ४ जुन २०२० रोजी संस्थेचे संस्थापक व आधारस्तंभ असलेले अशोक नाना निर्मळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले, याचा स्वामी विवेकानंद परिवाराला धक्का बसला. त्यांची काम करण्याची पध्दत वाखणण्याजोगी होती. अतिशय हुशार व्यक्ती आमच्यातून निघून गेली.

आज आम्ही सर्व त्यांची ध्येय धोरणे, संकल्प, विचारावरती संस्थेची व मंडळाची पुढील वाटचाल करत असून त्यांचा दुर्गादेवी मंदिर बांधण्याचा संकल्प आम्ही सर्व मित्र मंडळींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सन २०२३ साली भव्य-दिव्य असे मंदिर बांधून पूर्ण करून त्यांचे स्मृतीस अर्पण केले. अशा या वटवृक्षाप्रमाणे वाढलेल्या स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त माझ्या व माझ्या परिवारा तर्फे पुढील वाटचालीस मंगलमय हार्दिक शुभेच्छा!

***



...बाळासाहेब सुर्यवंशी
(मा.व्हा.चेअरमन व संचालक)

## स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या;

### जेऊर, ता.करमाळा., जि.सोलापूर ४१३२०३





वर्धापन दिन

संस्थापक

कै.अशोक(नाना) निर्मळ

चेअरमन

श्री.नागेश झांजुर्णे

व्हा.चेअरमन

श्रीमती वनिता निर्मळ

सचिव

श्री.प्रशांत पाथुडकर

**संचालक मंडळ**


श्री.बाळासाहेब सुर्यवंशी


श्री.संजय भोसले


श्री.मुरलीधर पोळ


श्री.प्रदीप घोलप


डॉ.हेमंत पांढरे


श्री.सुरेश लोंढे


श्री.निखिल मोरे


सौ.उज्वला जाधव

**कर्मचारी वृंद**

व्यवस्थापक

श्री.मधुकर साबळे

क्लार्क

श्री.मारूती भांगे

कॅशिअर

शिवम सुर्यवंशी

शिपाई

श्री.महादेव कुंभार

पिग्मी एजंट

श्री.विष्णू नलवडे



## सभासद व ठेवीदारांच्या

# विश्वासास पात्र ठरलेली पतसंस्था

आई दुर्गादेवीचा नवरात्र उत्सव साजरा करत असताना आई दुर्गादेवीच्या आशिर्वादाने व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनी प्रेरित होऊन १५ ऑगस्ट २००० साली कै.अशोक नाना निर्मळ (संस्थापक) यांचे अध्यक्षतेखाली स्वामी विवेकानंद पतंस्थेची स्थापना केली.

सामाजिक कार्यात झोकून दिलेल्या युवकांनी जर सामाजिक आर्थिक दुर्बल घटक, गरीब समाजाचा सर्वांगीण विकास करावयाचा असेलतर त्याला आर्थिक सहाय्यतेची गरज लागते. आणि ते मिळवण्यासाठी अनंत अडचणी असतात. हे ओळखून स्थापन केलेली पतसंस्था २५ व्या वर्षात पर्दापण करत आहे; याचा मला सार्थ अभिमान व गर्व आहे.

'चला उठा जागे व्हा..!' आपले ध्येय पूर्ण होईपर्यंत थांबू नका ! या स्वामी विवेकानंद यांच्या विचाराने प्रेरित होवून २४ वर्षापूर्वी २५ हजार भागभंडवलावरती चालू केलेली पतसंस्था आज ४० लाख भागभांडवल उभा करून यशाच्या शिखरावर आहे. दि.३१/३/२००१ साली १६ लाख ठेवी असलेली पतसंस्था आज ७ कोटी ठेवींचा टप्पा पार केला आहे. भाड्याच्या जागेत सुरू झालेली पतसंस्था स्वत:ची जाग घेऊन जवळजवळ ९० लाख रुपये खर्चून सुसज्ञ असे कार्यालय व सभागृह बांधले आहे. पतसंस्थेचा स्वनिधी रू.१ कोटी ५९ लाख आहे. एकूण ठेवीपैकी रू.४ कोटी २१ लाख बँक गुंतवणूक केली आहे. सुरक्षित व तारणी कर्ज वाटप रू.४ कोटी २५ लाख आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आपल्या पतसंस्थेला रू.११ लाख ६४ हजार नफा झाला आहे. एकंदरीत संस्थेची प्रगती सर्वच बाबतीत होत आहे. त्यासाठी सर्व सहकारी संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार व संस्थेचे कर्मचारी या सर्वांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे.

संपूर्ण संस्था संगणकीकृत केली आहे. त्यामुळे संस्थेचे कामकाज अचूक व पारदर्शक होवून सभासदांना तात्काळ सेवा देणे सोपे झाले आहे. सभासदांचा रू.५०,००० चा अपघाती विमा संस्था उतरवते. त्याचा फायदा सभासदांच्या वारसास होत आहे. सर्व सभासदांनी आमच्यावर जो विश्वास व एकनिष्ठता दाखवली आहे. त्याची जाणीव ठेवूनच आम्ही सभासद व ठेवीदारांच्या सेवेसाठी कटीबध्द आहोत. सभासदांचे समाधान हेच आमचे योगदान होय.



नवीन संस्था कार्यालय व सभागृह बांधकामाचे उद्घाटन करताना माजी आमदार नारायण(आबा) पाटील, श्री संत आनंदयोगी महाराज, संस्थापक कै.अशोक(नाना) निर्मळ, पतसंस्थेचे चेअरमन नागेश झांजुर्णे, आनंद पतसंस्थेचे चेअरमन डॉ.सुभाष सुराणा, पतसंस्थेचे संचालक व सभासद

सभासदांच्या स्वप्नपूर्तीसाठी आशावाद व आत्मविश्वास वाढवण्यासाठी, त्यांना समृध्द व स्वावलंबी बनवण्यासाठी कर्ज योजना राबवत आहोत. त्याचबरोबर आमचा सभासद स्वावलंबी व सुखी-समृध्द झाला पाहिजे. त्याने मुला-मुलींच्या शिक्षण व लग्नकार्यासाठी तसेच वृध्दपकाळातील वैद्यकिय खर्चासाठी लागणाऱ्या रकमेसाठी बचतीचा मार्ग अंगीकारून सुखी जीवन व्यथित केले पाहिजे; हेच आमचे ध्येय आहे. अशा या सभासदांच्या उन्नतीसाठी काम करणाऱ्या व त्यांचा विश्वास संपादन केलेल्या स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या २५ व्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा तसेच विश्वासास पात्र ठरलेल्या पतसंस्थेच्या वाटचालीत सहकार्य करणाऱ्या ठेवीदार, सभासद, नागरीकांचे जाहीर आभार !

***



..नागेश जोतीराम झांजुर्णे
(चेअरमन)


माजी आमदार





सरपंच, ग्रा.पं.जेऊर



उपसरपंच, ग्रा.पं.जेऊर
चेअरमन, स्वामी विवेकानंद पतसंस्था



नागरीकांच्या विश्वासास पात्र ठरलेली
स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर च्या रौप्यमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक
ग्रामपंचायत जेऊर, ता.करमाळा.
सरपंच, उपसरपंच
सर्व ग्रामपंचायत सदस्य

# योग्य नियोजनामुळे संस्था प्रगतीपथावर !



स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय मंडळाच्या माध्यमातून नवरात्र उत्सव साजरा करणे, नवरात्र उत्सवात विविध प्रकारचे देखावे सादर करणे, लकी ड्रॉ काढणे, डान्स स्पधा घेणे इ. सामाजिक कार्य करत असताना स्वामी विवेकानंद पतसंस्था स्थापन केली.

पतसंस्था स्थापन करणे सोपे असते, पतसंस्था मोठी करणे सोपी असते; पण ती पतसंस्था टिकवणे खूप अवघड असते. आणि हाच मुद्दा संचालक मंडळाने डोळ्यासमोर ठेवून योग्य ध्येय-धोरणे राबवून पतसंस्थेचा कारभार करत आहोत. सुरूवातीला पतसंस्थेच्या ऑफिससाठी लागणारे फर्निचर सर्व संचालकांनी वर्गणी करून खरेदी केले. स्थापनेपासून सर्व कामे नियोजन करून काटकसरीने करत आलो आहोत. मधल्या काळात जेऊरमध्ये कितीतरी पतसंस्था आल्या. ठेवीदारांना जादा व्याजाचे अमिष दाखवून खूप ठेवी गोळा केल्या व अल्पावधीतच पतसंस्था व बँका बंद पडल्या. त्याचा फटका ठेवीदारांना बसला. अशा वादळातही आपली पतसंस्था खंबीरपणे उभी राहिली. उलट त्या काळात आपल्या पतसंस्थेच्या ठेवी वाढल्या, ते केवळ योग्य नियोजन, काटकसर व नि:स्वार्थी भावनेने केलेला पारदर्शक कारभार. आपली पतसंस्था थोड्याच कालावधीत जेऊर व जेऊर परिसरात एक नावाजलेली पतसंस्था म्हणून नावारूपाला आली. पतसंस्थेकडे ठेवीचा ओघ वाढतच आहे म्हणून आपण बँकांपेक्षाही कमी व्याजदराने ठेवी स्वीकारल्या तरीही सभासद ठेवी ठेवत आहेत. त्यासाठी जादा व्याजदराचे अमिष कधीही दाखवले नाही. ठेवीदारांची ठेव कशी सुरक्षित राहील; त्या दृष्टीने विचार केला व योग्य कर्जदारास कर्ज वाटप करत



पतसंस्था राबवित असलेली अपघाती विमा योजनेचा लाभ घेताना अपघाती मयत झालेले सभासद कै.पोपट कांडेकर यांच्या पत्नीला रू.५०,०००/- चा धनादेश देताना संस्थेचे सचिव श्री.प्रशांत पाथुडकर, संचालक श्री.निखिल मोरे व कर्मचारी

आहोत. पतसंस्थेचा सर्वात महत्वाचा दुवा म्हणजे कर्ज वाटप. सुरक्षित व तारणी कर्ज वाटप करून ५०% रक्कम बँकेत गुंतवणूक करत आहोत. यातूनही थकबाकी राहिली तर वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करत आहोत. त्यामुळे पतसंस्थेची झेप प्रगतीच्या दिशेने होत आहे.

योग्य नियोजन करून कारभार करत असताना पतसंस्थेची स्वत:ची जागा असावी म्हणून २००६ साली ९.११ गुंठे जागा घेतली. सदर जागेत २०१५ साली संस्था कार्यालय व हॉल बांधण्याचा निर्णय झाला व बांधकाम चालू असताना अचानक दुसऱ्या मजल्याच्या बांधकामाचे नियोजन करून जेवण हॉल व किचन बांधण्याचा निर्णय घेतला व तो आज महत्वाचा झाला. सदर बांधकाम करताना सर्व काम काटकसरीने केले.आपल्या भागात वीट ५५००/- हजारी असताना संचालक मंडळाने परळीवरून वीट आणण्याचा निर्णय घेतला व चांगल्या प्रतीची वीट ४२००/- प्रमाणे खरेदी केली व संस्थेला आर्थिक फायदा झाला. अशाप्रकारे प्रत्येक गोष्टीत काटकसर करून बांधकाम पूर्ण केले. एवढ्या लहान पतसंस्थेचे भव्य-दिव्य कार्यालय व मोठा हॉल कुठेही नसेल असे बाहेरील लोक बोलतात.

स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय मंडळ व स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या माध्यमातून काम करत असताना आपल्या परिसरातील, ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करता यावा म्हणून सन २०१८ साली स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाची स्थापन केली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद सभागृहात अभ्यासाला बसण्याची व्यवस्था केली आहे. त्याचाही लाभ गरजू विद्यार्थी घेत आहेत. एकंदरीत स्वामी विवेकानंद परिवारातील प्रत्येक सदस्य प्रत्येक कार्यात तन-मन-धनाने झोकून देवून काम करून एक प्रकारे सामाजिक बांधिलकी जपत आहे. यापुढेही सर्वांची सेवा करत राहू. या आपल्या पतसंस्थेच्या २५ व्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

***



...श्री.प्रशांत मधुकर पाथुडकर
(सचिव)

जेऊर येथील
स्वामी विवेकानंद ग्रामीण
बिगरशेती सहकारी
पतसंस्थेच्या
२५ व्या रौप्यमहोत्सवी
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !






शुभेच्छुक
प्रोप्रा : संदीप कोठारी
कोठारी
सेल्स & फर्निचर
• फॅन्सी भांडी मॉल • सर्व फर्निचर
• इलेक्ट्रॉनिक्स • क्रॉकरी
• होम अप्लायलेन्स • गिफ्टींग, टॉईज
बसस्टॅन्ड जवळ, जेऊर, ता.करमाळा (मो.९४२३५८७४७६)


आमच्या प्रतिष्ठानचे सदस्य
श्री.रविराज पठाडे यांच्या सुविद्य पत्नी
सौ.अश्विनी रविराज पठाडे
यांची महिला व बालविकास विभागात
'मुख्य सेविका' पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
केशव प्रतिष्ठान
करमाळा, जि.सोलापूर (सर्व सदस्य)


करमाळा भूषण
कै.गिरधरदासजी देवी(भई)
माजी नगरसेवक व आमच्या प्रशालेचे अध्यक्ष
मा.श्री.कन्हैयालाल गिरधरदासजी देवी
यांना दि.१६ ऑगस्ट रोजी
असणाऱ्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा.
श्री.एस.एम.जगताप(मुख्याध्यापक), श्री.नरतवडेकर जे.डी., सौ.ए.जी.रंदिल,
श्री.आर.के.चिखले, श्री.जे.के.शिंदे, श्री.एस.आर.गलांडे, श्री.ए.बी.नेटके, श्री.सी.बी.खटके
श्री.डी.एच.पवार, श्री.एस.बी.फुलारी(लिपीक), श्री.एम.व्ही.कांबळे (प्र.प),
श्री.एल.डी.टेकाळे(नाईक), श्री.डी.पी.माने, श्री.एस.टी.पवार

# जय महाराष्ट्र मित्र मंडळ गणेशोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुनील जाधव



करमाळा(सं.प्र.) : जय महाराष्ट्र मित्र मंडळ गणेशोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुनील जाधव यांची निवड करण्यात आली आहे. गणेश उत्सवा निमित्त आयोजित बैठकीत जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच गणेश उत्सव समितीच्या कार्याध्यक्ष पदी संतोष उर्फ पिंटूशेठ गुगळे, उपाध्यक्ष पदी सुदेश भंडारे व तुळशीराम दुधाट तर खजिनदार पदी राजकुमार घाडगे, मिरवणुक प्रमुख पदी नितीन घोल व आरास प्रमुख पदी इसाक दारूवाले यांची निवड करण्यात आली.

जय महाराष्ट्र मित्र मंडळाची १९८८ साली स्थापना झाली असून, यावर्षी मंडळाचे ३७ वे वर्षे आहे. सालाबाद प्रमाणे याहीवर्षी गणेश उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यामध्ये प्रतिष्ठापना मिरवणूक, त्याचबरोबर श्री च्या समोर भव्यदिव्य देखाव्याचे आयोजन व विसर्जन मिरवणुक झांज पथक, बेन्जो ग्रुप, लेझीम पथक आदी वाद्यवृंद सहित काढण्यात येणार आहे. या बैठकीला अॅड.कमलाकर वीर, प्रमोद चांदगुडे, जय महाराष्ट्र पतसंस्थेचे चेअरमन अल्ताफ तांबोळी, व्हा.चेअरमन बाळासाहेब इंदुरे, विक्रमसिंह सुर्यवंशी, आदिनाथचे माजी चेअरमन संतोष पाटील, मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, रणजित ढाणे, मनोज पवार, सतीश थोरबोले, अनिल पाटील, अतुल बनसुडे, सुखदेव लष्कर, पांडूरंग जाधव, तरूण पटेल, शिरीष थोरबोले, अशोक चव्हाण, राहुल परदेशी, चंद्रकांत पाटील सर, अविनाश जोशी, मोहम्मद हाफिज कुरेशी, सुनील बनसोडे, दादा मिर्झा, शिवशंकर वांगडे, राजेंद्र चिवटे, गजानन ननवरे, बाळासाहेब कटारिया, निलेश बोरा, सुनीलशेठ कटारिया, संतोष कटारिया, संजुशेठ कटारिया खतवाले, सतीश शहापुरे, सुदामशेठ लेंडवे, गजेंद्र गुरव, इन्नुस मणेरी, जाफर घोडके, दिपक खडके, श्रावण इंगोले, विशाल चुंबळकर, यशराज दोशी, सचिन कटारिया, नैनेष कटारिया, राजेश कटारिया, संकेत कटारिया, अजिंक्य गुगळे, मेघनील देवी, डॉ.सुविध मेहता, हेमंत देवी, राहुल वनारसे, राजूशेठ चिवटे मिठाईवाले, वैभव वीर, अकिब सय्यद, कल्पेश राक्षे, अल्तमश सय्यद, प्रशांत अडसुळ, राहुल किरवे, राजू दिक्षित, शफी मणेरी आदी उपस्थित होते.

**शेतजमीन विकणे आहे**
गुळसडी येथील जिरायत शेती (२ एकर) योग्य किंमतीत विकणे आहे.
०: संपर्क :०
मो.9975770550
मो.9763225469

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
**श्रीजी इस्टेट एजन्सी**
पत्ता : मेनरोड, करमाळा.
● घरजागा, दुकान जागा
● प्लॉट व बंगले
● जमीन बिनशेती करणे
● व्यवहार करून दिले जातील
● सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

# स्वामी विवेकानंद पतसंस्थेचा २५ ऑगस्टला रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन



करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा २५ वा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन २५ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. पतसंस्थेच्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे; अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन नागेश झांजुर्णे यांनी दिली.

रौप्यमहोत्सवी वर्धापन दिना-निमित्त २५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजता स्वामी विवेकानंद व संस्थेचे संस्थापक कै.अशोक(नाना) निर्मळ यांचे प्रतिमेचे पूजन करून सभेची सुरूवात होईल. या सभेत संस्थेच्या यशात योगदान दिल्याबद्दल संस्थेचे माजी संचालक, कर्मचारी, पिग्मी एजंट, इंजिनियर, बांधकाम कॉन्ट्रॅक्टर या सर्वांचा सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर संस्थेच्या ज्या सभासदांनी संथेकडून कर्ज घेवून रेग्युलर व मुदतीत परतफेड केली आहे; अशा कर्जदारांचाही सन्मान संचालक मंडळा तर्फे केला जाणार आहे. यानंतर अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचन होईल. वार्षिक सभेनंतर दुपारी १ ते ३ या वेळेत संस्थेचे सर्व सभासद, खातेदार, गुंतवणूकदार या सर्वांना संस्थेच्या वतीने स्नेहभोजन ठेवले आहे. तरी त्याचा आस्वाद घेण्याचे आवाहन संस्थेचे व्हा.चेअरमन वनिता निर्मळ व सचिव प्रशांत पाथ्रुडकर यांनी केले आहे.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...
**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स, पोंधवडी** ता.करमाळा, जि.सोलापूर

खास श्रावणमासनिमित्त
**काशी दर्शन यात्रा**
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
कालावधी : दि.५/८ ते १३/८/२०२४
सहल खर्च : रू.१५,१००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

खास श्रावणमासनिमित्त
**कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्‌ तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२१/८ ते ३०/८/२०२४
सहल खर्च : रू.१३,८००

**चारधाम दर्शन**
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ हरिद्वार, ऋषीकेश
कालावधी : दि.१३/१० ते २७/१०/२०२४
सहल खर्च : रू.३३,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**केरळ दर्शन**
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी
कालावधी : दि.४/११ ते १४/११/२०२४
सहल खर्च : रू.२८,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**राजस्थान दर्शन**
जयपुर, पुष्कर, बिकानेर, जेसलमेर जोधपूर, उदयपूर, चित्तोडगड
कालावधी : दि.१७/११ ते २८/११/२०२४
सहल खर्च : रू.२४,५००

**नेपाळ दर्शन**
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, मनोकामना काठमांड, लुंबिनी, अयोध्या, प्रयागराज
कालावधी : दि.१/१२ ते १४/१२/२०२४
सहल खर्च : रू.२५,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**गुजरात दर्शन**
स्टॅच्यू ऑफ युनिटी, अक्षरधाम, गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम
कालावधी : दि.१६/१२ ते २४/१२/२०२४
सहल खर्च : रू.१४,०००

● रेल्वे प्रवास ● बस प्रवास
● भोजन व्यवस्था
● राहण्याची उत्तम सोय
**बुकींग सुरू**
नावनोंदणीसाठी त्वरीत संपर्क साधावा !

संपर्क : श्री.मयुर राऊत (८८८८३३३६३८, ९६८९४८८५८५)

**पुनम एजन्सी**
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.

# नरेंद्र पाटील यांची अमोल ढवळे यांच्या शिवम् स्टील दुकानास भेट



करमाळा(सं.प्र.) : आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी नुकतीच करमाळा येथे दौऱ्यावर असताना महामंडळाचे आर्थिक लाभार्थी उद्योजक अमोल ढवळे यांचे शिवम् बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स या दुकानास भेट देवून लाभार्थ्यांची चौकशी करून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अमोल ढवळे यांनी ड्रायव्हर पासून व्यवसायास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी स्वत:च्या गाड्या कर्जरूपाने घेऊन प्रगती केली. त्यानंतर भाड्याने दुकान घेऊन स्टील, सिमेंट व बिल्डींग मटेरियलचे दुकान टाकले. सिमेंट, वाळू, डस्ट, खडी, स्टील इ. बांधकाम मटेरियल ते सप्लाय करतात. नुकताच त्यांनी आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून नवीन डंपर खरेदी केला आहे. नरेंद्र पाटील हे करमाळा येथे मराठा उद्योजक मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर त्यांनी आवर्जुन ढवळे यांचे दुकानास भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत अमोल ढवळे, तानाजी ढवळे यांनी केले. यावेळी ढवळे यांनी महामंडळाच्या कर्जाचा माझ्या व्यवसायास फायदा झाला असून, मराठा तरूणांनी महामंडळाच्या योजनेचा आर्थिक लाभ घ्यावा; असे आवाहन केले. यावेळी महाराष्ट्र नॉलेजचे पूर्व संघटन मंत्री व समन्वयक अभिजीत पाटील, किरण झोळ, दिपक चव्हाण, रोहित झेंडे, दिग्विजय घोलप, संतोष कांबळे, तानाजी ढवळे, संतोष राजपुरे, अभिजीत पाटील, मनोज कुलकर्णी, घोलप गुरूजी, मंगेश ओहोळ आदी उपस्थित होते.

## माजी आमदार नारायण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त
# २२ व २३ ऑगस्टला जेऊर येथे कर्मयोगी व्याख्यानमाला



करमाळा(सं.प्र.) : माजी आमदार नारायण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त २२ व २३ ऑगस्ट रोजी जेऊर येथे कर्मयोगी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेत २२ ऑगस्टला सकाळी दहा वाजता प्रख्यात वक्ते व दैनिक लोकमत पुणे चे संपादक संजय आवटे यांचे "महाराष्ट्राचा नाद नाय करायचा" या विषयावर व्याख्यान होणार आहे. २३ ऑगस्टला दुपारी दोन वाजता थोर विचारवंत व मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती उच्च बी.जी.कोळसे-पाटील यांचे "भारतीय संविधान आणि आजचे वास्तव" या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधानपरिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. व्याख्यानमाला कर्मयोगी गोविंदबापू पाटील सभागृह, बाजारतळ, जेऊर येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ नागरीकांनी घ्यावा; असे आवाहन कर्मयोगी व्याख्यानमालाचे प्रमुख प्रा.डॉ.संजय चौधरी व भारत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनंत शिंगाडे यांनी केले आहे.



दुध, कुल्फी, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड,पनीर, ताक, खवा, तुप, क्रीम मिळण्याचे ठिकाण
चिवटे उपहारगृह राशिनपेठ, करमाळा. (मो.८८८८१४७००५)

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत
# स्वरा कुलकर्णी, सान्वी पोळ, प्राची वाघमारे प्रथम

करमाळा(सं.प्र.) : यशकल्याणी संस्था, शिक्षण विभाग व जिल्हा इंग्लीश टीचर्स असोसिएशन यांचे तर्फे लोकशिक्षिका लिलाताई दिवेकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत स्वरा कुलकर्णी, सान्वी पोळ, प्राची वाघमारे यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. लिलाताई दिवेकर यांच्या स्मृती विविध उपक्रमांनी जपण्याचा प्रयत्न यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे करत आहेत. या स्पर्धेत ११ तालुक्यातून दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना यशकल्याणी संस्थेतर्फे रकमेच्या रोख बक्षीसांसह सन्मानचिन्ह, गोल्ड मेडल व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

करमाळ्यात प्रथमच समर्थ आय.व्ही.एफ.सुविधा
कृष्णा हॉस्पिटल
● कार्डिअॅक, लॅप्रोस्कोपी अॅन्ड मॅटर्निटी केअर सेंटर ●
राशिनपेठ, करमाळा. फोन(०२१८२) २२००८९

डॉ.प्रमोद रासू कांबळे
एम.डी.(जनरल मेडिसीन)
कन्सल्टींग फिजीशियन
हृदयविकार, मधूमेह व मेंदूविकार तज्ञ

डॉ.सौ.कविता प्रमोद कांबळे
एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.(मुंबई)
कन्सल्टींग गायनॅकोलॉजिस्ट & सोनोलॉजिस्ट
स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र तज्ञ

स्टाफ/कर्मचारी पाहिजेत
रूग्णालयात काम करण्यासाठी खालीलप्रमाणे स्टाफ/कर्मचारी पाहिजेत
- प्रशिक्षित नर्स
- कॅशियर
- प्रशिक्षित पुरूष कर्मचारी
- कॉम्प्युटर ऑपरेटर/रिसेप्शनिस्ट
- मावशी/दाय/प्रसुती सहायक
- वॉचमन/रखवालदार

(टीप : अनुभवानूसार प्राधान्य व योग्य वेतन मिळेल.)

उपलब्ध सुविधा

मेडिसीन....
- २४ तास अत्यावश्यक सेवा
- आय.सी.यु./आय.सी.सी.यु.
- ई.सी.जी., ● कार्डियाक मॉनिटर्स
- डिफ्रिब्रीलेटर ● एक्स-रे
- कृत्रिम श्वासोच्छवास व्यवस्था
- सेंट्रल ऑक्सिजनची सोय
- रक्तदाब, मधुमेह, मेंदूविकार व फुफ्फुसांचे आजाराचे निदान व उपचार
- सर्पदंश उपचार, पॅथॉलॉजी लॅब
- मेडिकल स्टोअर्स ● इमर्जन्सी जनरेटरची सोय

स्त्रीरोग व प्रसुती विभाग...
- अल्ट्रासोनोग्राफी
- एन.एस.टी.मशिन
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- प्रसुतीपूर्व तपासणी
- सुखरूप बाळंतपणाची सोय
- वेदनारहित प्रसुती
- वंध्यत्व चिकित्सा केंद्र
- स्त्रियांच्या सर्व ऑपरेशनची सोय
- कॉल्पोस्कोपी

ओपीडी वेळ..
सकाळी ९ ते ४, सायं. ७ ते ९(रविवारी बंद)

नावनोंदणी ओपीडी वेळ : सकाळी ८ ते २ व दुपारी ३ ते ७ (मो.७०८३०७१६१० या नंबरवर सात दिवसापर्यंत नांवनोंदणी घेण्यात येईल) ● रविवारी अत्यावश्यक सेवा चालू ● २





माजी आमदार
**मा.श्री.नारायण(आबा) पाटील**
यांच्या वाढदिवसानिमित्त

ध्यास तुमच्या आरोग्याचा,
वसा आमुचा लोकसेवेचा






# भव्य मॅरेथॉन स्पर्धा

**पुरुष खुला गट**

- प्रथम बक्षीस : १५,५५५/-
- द्वितीय बक्षीस : ११,१११/-
- तृतीय बक्षीस : ७,७७७/-
- उत्तेजनार्थ : २५ बक्षीसे (प्रत्येकी १०००/-)

गुरूवार
दि.२२/८/२०२४ रोजी
सकाळी ८.०० वा.

**टीप...**
- स्पर्धकांना संयोजकाकडून सिव्हलेस टी शर्ट देण्यात येतील.
- मॅरेथॉन स्पर्धा करमाळा–माढा विधानसभा मतदार संघातील स्पर्धकांसाठी असेल.

**नांवनोंदणी अंतिम तारीख :**
दि.२१/८/२०२४ (सायं.५ वा.पर्यंत)

**मॅरेथॉन मार्ग :** बाजारतळ–गणपती मंदिर–सोनारपेठ–मेनरोड–बसस्टॅन्ड–कुंभेज फाटा.

**परतीचा मार्ग :** कुंभेज फाटा–जेऊर बसस्टॅन्ड–मेनरोड–सोनारपेठ–गणपती मंदिर–बाजारतळ

**मोफत प्रवेश**

**संपर्क** बाळासाहेब सरक (८१८२९५२५२५), विनोद गरड (९४२१०३३२०३)
पांडुरंग वाघमारे (९४२३५२६४५९), दत्तात्रय वाघमोडे (९४२३९८३३५०)
अंगद पठाडे (९५५२९९७८७५)

संयोजक
**पै.पृथ्वीराज भैय्या पाटील**
**मित्र मंडळ करमाळा–माढा**



सस्नेह निमंत्रण

वर्ष १४ वे

# कर्मयोगी व्याख्यानमाला

बंधू–भगिनींनो.., वारकरी विचारधारेचा आणि शिव–शाहु, फुले–आंबेडकरांचा कृतीशील वारसा अभिमानाने सांगणारा आपला महाराष्ट्र ! या महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांचा वसा आणि वारसा जोपासण्याचे काम गेली अनेक वर्षापासून आम्ही **भारत महाविद्यालयाच्या** माध्यमातून करीत आलो आहोत.

**लोकनेते मा.आमदार नारायण(आबा) पाटील** यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कर्मयोगी व्याख्यानमालेच्या माध्यमातून विचारांची शिदोरी आपल्या सोबत देण्याचा आमचा हा एक विनम्र प्रयत्न !



**गुरूवार, दि.२२/८/२०२४, सकाळी १०.०० वाजता**

वक्ते : **मा.संजय आवटे** (प्रख्यात वक्ते व संपादक, दै.लोकमत पुणे)
विषय : **'महाराष्ट्राचा नाद नाय करायचा !'**



**शुक्रवार, दि.२३/८/२०२४, दुपारी २.०० वाजता**

वक्ते : **मा.न्यायमूर्ती बी.जी.कोळसे–पाटील** (थोर विचारवंत व माजी न्यायाधीश उच्च न्यायालय, मुंबई)
विषय : **'भारतीय संविधान आणि आजचे वास्तव'**

**प्रमुख उपस्थिती**

**मा.धैर्यशील मोहिते–पाटील**
खासदार, माढा

**मा.रोहित पवार**
आमदार, कर्जत - जामखेड

**मा.रणजितसिंह मोहिते–पाटील**
विधानपरिषद सदस्य

**आपले नम्र**

**प्रा.डॉ.संजय चौधरी** (प्रमुख, कर्मयोगी व्याख्यानमाला) **डॉ.अनंत शिंगाडे** (प्राचार्य, भारत महाविद्यालय जेऊर)

**प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वृंद भारत महाविद्यालय, जेऊर**

**• स्थळ : कर्मयोगी गोविंदबापू पाटील सभागृह बाजारतळ जेऊर, ता.करमाळा जि.सोलापूर •**

आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, करमाळा संचलित..

# जाधव-पाटील हॉस्पिटल, करमाळा

व महाराष्ट्रातील प्रसिध्द मुळव्याध तज्ञ

## डॉ.प्रदीप तुपेरे एम.बी.बी.एस., एम.एस.(जन.सर्जन)

यांचे संयुक्त विद्यमाने



# सवलतीच्या दरात उपचार शिबीर

**मुळव्याध(पाईल्स) वर इंजेक्शन (स्क्लेरोथेरपी), लेझर ट्रिटमेंट**



### रूग्णांना ही लक्षणे असल्यास शिबीराचा लाभ घ्यावा..!

- शौचमार्गास दाह, जळजळ होणे
- शौचमार्गास खाज येणे
- गुद्ध्दाराभोवती आग होणे
- कोंब बाहेर येणे
- शौचातून रक्त येणे
- चिर पडणे.

### मुळव्याध इंजेक्शन/लेझरसाठी पाळावयाच्या सूचना...

- इंजेक्शन घेण्यासाठी ५ तास उपाशीपोटी यावे (सकाळी ६ नंतर खाऊ-पिऊ नये)
- डायबेटीस व ब्लडप्रेशर असल्यास सकाळचा डोस घ्यावा.
- इंजेक्शन मुळव्याधीच्या ठिकाणी दिले जाते
- हाताच्या शिरेतून भुलतज्ञांमार्फत भुल दिली जाते
- सोबत टॉवेल किंवा लुंगी आठवणीने घेवून येणे

### इंजेक्शनचे विशेष गुणधर्म...

- मुळव्याधीच्या कोंबाना रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्याभोवती विशिष्ट इंजेक्शन देवून रक्त पुरवठा गोठविण्यात येतो.
- मुळव्याधीवर अत्याधुनिक उपचार पध्दती, ऑपरेशनची गरज नाही
- ॲडमिट होण्याची गरज नाही
- मुळव्याधीच्या पहिल्या व दुसऱ्या अवस्थेतील रूग्णांकरीता अतिशय उपयुक्त उपचार पध्दती
- खाण्याचे विशेष पथ्य नाही.

**नांवनोंदणी आवश्यक**

**शिबीर**

**रविवार, दि.२५/८/२०२४ रोजी**
**सकाळी ८.०० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत**

**टीप : सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत हॉस्पिटलला हजर राहणे.**

**पत्ता : जाधव-पाटील हॉस्पिटल अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा.**

शिबीरासाठी नावनोंदणी संपर्क : फोन (02182) 299611

**मो.नं.7559214551, 9322945948, 7776999034, 7507314133**


नागपंचमी व रक्षाबंधन निमित्त..!
घडणावळीवर
गोल्ड ज्वेलरी १५% सूट*
टेम्पल ज्वेलरी २०% सूट*
कालावधी-दि.३/८/२०२४
ते २०/८/२०२४ पर्यंत
सोने खरेदीसाठी
सोनरी वेळ..!
AK
मे. आनंदी ज्वेलर्स
मेन रोड, करमाळा.
94 23 33 38 47 / Ph.02182-222 209


Follow Us :
Since - 1985
YASH
महा मान्सुन सेल
नव्या फॅशनने
बनवा
व्यक्तिमत्त्वाला
अधिक रुबाबदार!
यश
कलेक्शन
मेनरोड, करमाळा
लाईफस्टाईल
राजवैभव मंगल कार्यालय शेजारी, नातेपुते
सारीज
जय महाराष्ट्र चौक, मेनरोड, करमाळा
शॉपी
गुजर गल्ली, करमाळा
मेनरोड, करमाळा 9150 31 1008

# पाच वर्षात विकासाचे राजकारण केले : आ.संजयमामा शिंदे






करमाळा(सं.प्र.) : सन २०१९ नंतर करमाळा मतदारसंघाचा आमदार झाल्यापासून आपण तालुक्यात विकासाचे राजकारण केले. एखादी गोष्ट होत असेलतर त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला व ती कामे मार्गी लावली. परंतु एखादी न होणारी गोष्ट विनाकारण लोकांना खोट्या भुलथापा देऊन फसवणूक करणे हे काम मी केलं नाही. त्यामुळेच २०१९ ते २०२४ या कार्यकाळात मतदार संघात भुसंपादन, सिंचन, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण व प्रशासन या कामासाठी जवळपास तीन हजार कोटी निधी आपण उपलब्ध केला आहे; असे प्रतिपादन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

संगोबा व आवाटी येथे विविध विकास कामांचा भुमीपूजन व लोकार्पण सोहळा आमदार शिंदे यांचे हस्ते व माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर तानाजी झोळ, विलास पाटील, चंद्रहास निमगिरे, उध्दव माळी, सुनील सावंत, उद्योजक भरत आवताडे, ॲड.राहुल सावंत, कंदरचे सरपंच मौला मुलाणी, अशोक पाटील, ॲड.अजित विघ्ने, उपसरपंच अमर भांगे, अजिंक्य पाटील, विनय ननवरे, गोरख गुळवे, किरण फुंदे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.शिंदे म्हणाले, की तालुक्यातील रखडलेले प्रकल्प त्यामध्ये नव्याने सबस्टेशनची निर्मिती, सबस्टेशनची क्षमतावाढ किंवा टेंभूर्णी-जातेगाव रस्ता, कुकडी प्रकल्प क्षेत्रातील गावांना पाणी देण्याचा विषय, डिकसळ पुल, हॅम अंतर्गत ७१ कि.मी. चा रस्ता ही विकासकामे मंजूर केल्याचे समाधान आहे.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करमाळा - बोरगाव - घारगाव ते जिल्हा रस्ता (५.४ कोटी ५० लाख), बोरगाव ते निलज रस्ता (२ कोटी), निलज ते बिटरगाव श्री रस्ता (३ कोटी २८ लाख), संगोबा घाट (९० लाख), आवाटी दर्गा वॉल कंपाउंड (९९ लाख), गौंडरे फाटा ते नेरले रस्ता (२ कोटी ८५ लाक), फिसरे - हिसरे - हिवरे ते कोळगाव रस्ता (२ कोटी) इ. विकासकामांचे भुमीपूजन व लोकार्पण झाले. यावेळी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ते विकास आराखडासाठी नावे द्यावीत : रश्मी बागल



करमाळा(सं.प्र.) : रस्ते विकास आराखडा २०२१ ते २०४१ राबविला जात असून त्यासाठी प्रत्येक गावातील वाडी-वस्तीवरील रस्ते प्लॅनमध्ये घेण्यासाठी रस्त्यांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून करमाळा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत व नागरीकांनी आपल्या गावातील, वाड्या - वस्तीवरील रस्ते विकास आराखडासाठी नावे द्यावीत; असे आवाहन भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी केले आहे

याबाबत जादा माहिती देताना सौ.बागल म्हणाल्या, की वाडी वस्ती वरील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी रस्ते प्लॅनमध्ये असणे आवश्यक असते. परंतु रस्ते प्लॅन मध्ये नसल्यामुळे अनेकवेळा अशा रस्त्यांचे मजबुतीकरण करता येत नाही. त्यामुळे असे रस्ते प्लॅनमध्ये घेण्यासाठी २० वर्षाचा विकास आराखडा तयार केला जातो. त्यानुसार जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून सदर रस्त्यांचे सर्वे करून सदर रस्त्यांचा समावेश ग्रामीण मार्गामध्ये केला जात असतो. महाराष्ट्र शासनाचा २००१ ते २०२१ हा रस्ते विकास आराखडा यापूर्वी तयार करण्यात आलेला होता. पुढील २० वर्षाचा रस्ते विकास आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायत संमती असणे आवश्यक आहे. सदर रस्त्यांची यादी तयार झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून सदर रस्त्यांना ग्रामीण मार्ग मिळवण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला जाईल. त्यानंतर त्या रस्त्यांचा समावेश ग्रामीण मार्गामध्ये केला जाईल; असेही रश्मी बागल यांनी सांगितले.

## योगा स्पर्धेत दत्तकला इंटरनॅशनल स्कुल व कॉलेजचे यश



करमाळा(सं.प्र.) : तालुकास्तरीय शालेय योगा स्पर्धेत दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला इंटरनॅशनल स्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी राज धायगुडे व संचित होले यांनी प्रथम क्रमांक पटकाविला असून त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत बारावी कॉमर्सचा विद्यार्थी संचित होले याने १७ वर्षाखालील रिध्दीमिक योगा प्रकारामध्ये प्रथम तर अकरावी सायन्सचा विद्यार्थी राज धायगुडे याने १९ वर्षाखालील योगा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या दोघांची १९ सप्टेंबर रोजी जुन्नर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या दोघांचे अभिनंदन दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, क्रिडा शिक्षक सुनिल शिवपुजे यांनी केले.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
fastrack
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझार सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

## वाशिंबे येथे ९० हजार रूपयाच्या शेळयाची चोरी

करमाळा (सं.प्र.) : वाशिंबे येथे पवार वस्तीवर घरासामोरील पत्र्याच्या शेडमध्ये बांधलेल्या ९० हजार रुपयाच्या शेळ्याची चोरी झाली आहे. हा प्रकार ११ ऑगष्टच्या मध्यरात्री झाला आहे. या प्रकरणी प्रशांत मच्छिंद्र पवार रा.वाशिंबे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की आमच्या घरासामोर असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये ११ ऑगष्टला सायंकाळी चार काळ्या शेळ्या,एक पाठरू व चार बोकड बांधले होते. त्यारात्री चोरट्यांनी सर्व शेळ्या किमंत ९० हजार रूपये चोरून नेले आहे. या प्रकरणी करमाळा पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस शिपाई चेतन पाटील हे करत आहेत.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : प्राण्यांना बेकायदेशीर बांधून ठेवून चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयपणे वागणूक देणाऱ्या विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मनजीत संजय भोसले यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १४ ऑगस्टला सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास करमाळा शहरातील हॉटेल अलजायकाच्या भींतीच्या अडोशाला दोन जर्सी गायीची लहान खोंडे पडीक जागेत बांधून निर्दयपणे वागणूक देऊन जनावरांना चारा पाण्याची सोय केली नाही. या जनावरांना कत्तल करण्यासाठी घेऊन जाणार होते. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर हे करत आहेत.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) :मामाच्या मुलीसोबत लग्न करू नको नाहीतर तुला जीवे मारू अशी धमकी देवून आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या दोघाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार १३ ऑगस्टला पोफळज येथे घडला आहे. यात अजय बेलगंग्या पवार रा. पोफळज यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की माझा भाऊ राम (वय-१९) हा माझे मामाच्या मुलीसोबत लग्न करावयाचे म्हणत होता. हे लखन जिगर काळे रा. दहिगाव व बतुल्या जिगर काळे रा.कोंढेज यांना माहित होते. या दोघांनी माझे भावास तू तुझ्या मामाच्या मुलीसोबत लग्न करू नको नाहीतर, तुला जिवे मारू अशी धमकी दिली. या वारंवार दिलेल्या धमकीला घाबरून माझा भाऊ राम याने १३ ऑगस्टला घरातील लोखंडी अँगलला दोरीने गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी करमाळा पोलीसांनी लखन काळे व बतुल्या काळे या दोघांच्या विरूध्द आत्महत्येस प्रवृत्त असा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

## शेतीच्या पिकाचे नुकसान केल्या प्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : शेतात बेकायदेशीर प्रवेश करून ट्रॅक्टरच्या सहाय्याने अतिक्रमण करून ३० गुंठे जमिनीतील सुर्यफूल व तूर या पीकावर ट्रॅक्टर चालवून २५ हजार रूपयाचे नुकसान केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. यात उध्दव येताळ वीर (वय-८१, रा.शेलगाव क) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या शेतात सूर्यफुल व तूर या पीकाची पेरणी केली होती. १२ ऑगस्टला माझा पुतण्या सुनील विष्णू वीर याने ट्रॅक्टरच्या सहाय्याने अतिक्रमण करून पीकावर ट्रॅक्टर घालून २५ हजार रूपयाचे नुकसान केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## झरे येथील अंगणवाडीची इमारत जमीनदोस्त

करमाळा : झरे येथील अंगणवाडीची इमारत कोणीतरी पाडून जमीनदोस्त केली आहे. या प्रकरणी करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यात प्रभारी बालविकास अधिकारी आनंद अरूण जाधव यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. पंचायत समितीमधून झरे येथील अंगणवाडी क्र.१६ या इमारतीचे बांधकाम पडल्याबाबतचे कळविले. त्यानंतर त्याची खातरजमा केली असता, सदरची इमारत अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून पाडली आहे. पोलीसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## किरकोळ कारणावरून चौघांनी एकास बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : बांधावर दगडे टाकतो का..? असे म्हणून चौघांनी एकास बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार जिंती येथे १३ ऑगस्टला दुपारी साडेबारा वाजणेच्या सुमारास घडला आहे. यात अरूण नामदेव देवकर (वय-६०) रा. जिंती यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की मी जिंती येथील आमच्या शेतात ऊसाला सरी काढण्याचे काम करत होतो. त्यावेळी बलभीम महाळू गायकवाड रा. जिंती हा आला व त्यांनी बांधावर दगड टाकतो का..? असे म्हणून मारहाण करून शिव्या दिल्या. घरातील लोक सोडवण्यास आलेतर त्यांनापण त्यांने शिव्या दिल्या. त्यानंतर आम्ही करमाळा पोलीसात कंप्लेट देण्यासाठी निघालो असताना, रेल्वे गेटजवळ बलभीम गायकवाड व अन्य तिघेजण अनोळखी लोकांनी मला आडवून काठीने, लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## वाशिंबे येथे घरासमोर लावलेल्या हिरोहोंडाची चोरी

करमाळा (सं.प्र.) : घरासमोर हॅन्डल लॉक करून लावलेल्या मोटारसायकलची चोरी झालेली आहे. हा प्रकार वाशिंबे येथे ११ ऑगस्टच्या मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी अशरफ अलिबशीर शेख (रा.वाशिंबे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. ११ ऑगस्टला माझ्या मालकीची ४५ हजार रूपये किंमतीची सिल्व्हर कलरची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल क्र.एमएच ४५ एपी ८२१६ ही घरासमोर हॅन्डल लॉक करून लावली होती. त्याच मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी सदरची मोटारसायकल चोरून नेली आहे.

## नववीच्या वर्गातील १४ वर्षाच्या मुलीस पळवून नेले

करमाळा (सं.प्र.) : १४ वर्षाच्या अज्ञात बालिकेस नववीच्या वर्गातून घरी परत येत असताना रस्त्यातून पळवून नेले आहे. हा प्रकार १४ ऑगस्टला सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी ३५ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की माझी १३ वर्षे ११ महिने वयाची मुलगी गावातील हायस्कुलमध्ये गेली होती. ती परत आली नाही. याबाबत तपास केला असता, गावातील लोकांनी अविनाश बाळकृष्ण कांबळे याने तिला मोटारसायकल वरून पळवून नेले आहे; असे सांगितले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## २२ ऑगस्टला भव्य मॅरेथॉन स्पर्धा



करमाळा(सं.प्र.) : माजी आमदार नारायण (आबा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पै.पृथ्वीराज भैय्या पाटील मित्र मंडळ करमाळा-माढा यांचे वतीने २२ ऑगस्टला भव्य मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा पुरुष खुला गटासाठी होणार असून यामध्ये प्रथम बक्षीस १५ हजार ५५५ रूपये, द्वितीय बक्षीस ११ हजार १११ रूपये, तृतीय बक्षीस ७ हजार ७७७ रूपये, उत्तेजनार्थ २५ बक्षीसे (प्रत्येकी १००० रूपये) ठेवण्यात आले आहे. ही स्पर्धा गुरूवारी २२ ऑगस्टला सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग बाजारतळ - गणपती मंदिर - सोनारपेठ - मेनरोड - बसस्टॅन्ड - कुंभेज फाटा व परतीचा मार्ग कुंभेज फाटा - जेऊर बसस्टॅन्ड - मेनरोड - सोनारपेठ - गणपती मंदिर व बाजारतळ असा राहणार आहे. या स्पर्धेत स्पर्धकांना मोफत प्रवेश दिला जाणार असून संयोजकाकडून सिव्हलेस टी शर्ट देण्यात येणार आहेत. तसेच ही स्पर्धा करमाळा-माढा विधानसभा मतदार संघातील स्पर्धकांसाठी असणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी नांवनोंदणीसाठी बाळासाहेब सरक (८९८२९५२५२५), विनोद गरड (९४२१०३३२०३), पांडुरंग वाघमारे (९४२३५२६४५९), दत्तात्रय वाघमोडे (९४२३९८३३५०), अंगद पठाडे (९५५२९९७८७५) यांच्याशी २१ ऑगस्ट (सायंकाळी ५ वा. पर्यंत) पर्यंत संपर्क साधावा.




साई
स्टील रेलिंग
& किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे
स्टील रेलिंग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.



प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

श्री गजानन अगरबत्ती

● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# देवेंद्र फडणवीस यांनी बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावले : मोहन डोंगरे

## करमाळ्यात ३०० कामगारांना गृहपयोगी भांडी संच वाटप





करमाळा(सं.प्र.) : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच खऱ्या अर्थाने बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावले असल्याचे मत आई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोहन डोंगरे यांनी व्यक्त केले.

श्रीराम प्रतिष्ठान व भाजपा कामगार आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बांधकाम कामगार मेळाव्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. पुढे बोलताना मोहन डोंगरे म्हणाले, की देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व कारभार करायला लागल्यापासून सर्वसामान्य जनतेचा विचार शासन दरबारी व्हायला लागला व बांधकाम कामगार सारख्या कष्टकरी वर्गाला न्याय मिळायला लागला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे हे उपस्थित होते. यावेळी घुगे यांनी बांधकाम कामगार हा दुर्लक्षित घटकाकडे हा श्रीराम प्रतिष्ठानच्या माध्यमातून गणेश चिवटे यांनी राबवलेला उपक्रम स्तुत्य आहे. कामगारांनी या सर्व योजनांचा लाभ अवश्य घ्यावा. सोबतच आपले आरोग्य जपावे व व्यसनापासून दूर रहावे; असे आवाहन उपस्थित बांधकाम कामगारांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चिवटे म्हणाले, की भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून बांधकाम कामगारांना अनेक नवीन योजना लागू करण्यात आल्या. सन २०१७ ला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी या योजनेत आमुलाग्र बदल करून व्याप्ती वाढवली व या योजनेचा जास्तीत जास्त कष्टकरी घटकांना लाभ देण्यासाठी योजना बनवली. त्यामुळे गर्भातील बालकापासून ते कामगारांच्या मृत्यूपर्यंत चे सर्व लाभ देणारी जगातील एकमेव योजना बनवली आहे. त्यामुळे आता बांधकाम कामगारांना शिक्षण, आरोग्य, विवाह ते शेवटपर्यंतच्या सर्व लाभाची योजना बनवल्या.

यावेळी भाजपाचे तालुका सरचिटरीस नितीन झिंजाडे यांनी बांधकाम कामगारांचा देशाच्या जडणघडणीत सर्वात मोठा सहभाग आहे. त्यामुळे त्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान व्हावा; यासाठी भाजपा सरकारने बांधकाम कामगार सारखी दूरदृष्टी योजना बनवली आहे. तालुक्यातील बांधकाम कामगारांच्या पाठीमागे गणेश चिवटे शेवटी खंबीरपणे उभा राहून त्यांना सर्व योजना मिळवून देण्यासाठी कटीबध्द राहणार आहेत; असे सांगितले.

यावेळी बांधकाम नोंदणी करण्यासाठी सहकाय करणारे इंजिनियर प्रविण गायकवाड, रोहित कोरपे, निलेश माने, लक्ष्मण कांबळे यांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष पै.अफसर जाधव, तालुका अध्यक्ष रामा ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, तालुका सरचिटणीस काकासाहेब सरडे, डॉ.अभिजीत मुरूमकर, बंडू शिंदे, आजिनाथ सुरवसे, विनोद महानवर, उमेश मगर, सोमनाथ घाडगे , धर्मराज नाळे, दिपक गायकवाड, गणेश परदेशी, हरीभाऊ झिंजाडे, भैय्या गोसावी, लक्ष्मण शेंडगे, दादासाहेब देवकर, मच्छिंद्र हाके, नितीन निकम, सुनील जाधव, प्रकाश ननवरे, गणेश माने, दादासाहेब कडू, दिलीप चव्हाण, जयसिंग भोगे, बापू मोहोळकर, हर्षल शिंगाडे इ. उपस्थित होते. उपस्थितांचे आभार भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अमोल पवार यांनी मानले.

## माजी नगरसेवक कन्हैयालाल देवी यांच्या वाढदिवसानिमित्त

# गिरधरदास देवी प्रतिष्ठान मध्ये सूर्यनमस्कार यज्ञ-३ संपन्न

करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी नगरसेवक कन्हैयालाल देवी यांच्या वाढदिवसानिमित्त नवभारत इंग्लीश स्कुल, ट्वींकलींग स्टार्स आणि गिरधरदास देवी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने देवी विद्यालयाच्या प्रांगणात साखळी सुर्यनमस्कार यज्ञ -३ हा कार्यक्रम संपन्न झाला.

प्रशालेमध्ये सुर्योदयापासून (६.१२) सुर्यास्ता पर्यंत (६.५७) साखळी सुर्यनमस्कार करण्यात आले. सर्वप्रथम कन्हैयालाल देवी व सुनिता देवी यांचे हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मुख्याधिकारी सचिन तपासे, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, वीणा पवार, ललिता वांगडे, संचालक अमोद संचेती, चंद्रकांत देवी, विजयकुमार दोशी आदी मान्यवर उपस्थित होते.



शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी सुर्यनमस्कार खूप महत्वाचा आहे. सर्व व्यायामांमध्ये परिपूर्ण व्यायाम म्हणजेच सुर्यनमस्कार. या कार्यक्रमामध्ये दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच उत्स्फुर्तपणे सुर्यनमस्कार केले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका मोहिते मॅडम, मुख्याध्यापक जगताप सर यांचेसह सर्व शिक्षक, कर्मचारी यांनीही सुर्यनमस्कार करून या यज्ञामध्ये आपला सहभाग नोंदवला.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये स्वातंत्र्याचा ७८ वा महोत्सव साजरा



करमाळा (सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल, ट्वींक्लींग स्टार्स व श्री गिरधरदास देवी विद्यालयात स्वातंत्र्याचा ७८ वा महोत्सव विविध कार्यक्रमा साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रतिमा पूजन केले गेले. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी झेंड्याला सलामी देत मार्च पास केले. नर्सरी, एलकेजी, युकेजी मधील छोटी चिमुकली मुले चाचा नेहरू, लोकमान्य टिळक, झाशीची राणी, भारत माता, भगतसिंग अशा विविध पोशाखामध्ये खूपच साजरी दिसत होती. दुसरीतील स्वराज गायकवाड याने देशभक्तीपर नृत्य सादर केले. तिसरीतील मुलींनी देशभक्तीपर गीत गायले. चौथीतील विद्यार्थ्यांनी डंबेल्स कवायत सादर केली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली. यावेळी विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे वाटप करण्यात आली. यावेळी विजयकुमार दोशी, सुनिता देवी, स्नेहल कटारिया, सुनिता मोहिते, शितल करे, गायकवाड सर, अमोद संचेती, चंद्रकांत देवी इ. मान्यवर उपस्थित होते.

# इरा पब्लिक स्कुल मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण येथील इरा पब्लिक स्कुल मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहन सेवानिवृत्त सैनिक अनिल साखरे, मेजर आकाश पोळ यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.ब्रिजेश बारकुंड, उपाध्यक्ष हरिश्चंद्र बारकुंड, सदस्य बाबुराव अवसरे, पालक-शिक्षक संघाचे सदस्य बाबुराव लबडे, विकास गव्हाणे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्वागत गीत, ध्वजगीत, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम इ.चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र व बक्षीसे वाटप करण्यात आले. तसेच वर्षभर एकही सुट्टी न घेतलेल्या शिक्षिका पटकुलकर मॅडम यांना रोख ५००० रू. देऊन गौरविण्यात आले. इंग्रजी विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षक जाधव यांचाही सन्मान करण्यात आला. खशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती संघटक पुरस्कार प्राप्त क्रिडा शिक्षक शेवाळे यांचाही सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन ढेंबरे सर, ननवरे मॅडम, माने मॅडम, वाघमोडे मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार हराळे सर यांनी मानले.

# कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा



करमाळा(सं.प्र.) : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने बाजार समितीचे उपसभापती शैलजाताई मेहेर यांचे हस्ते व संचालक शंभुराजे जगताप यांचे प्रमुख उपस्थित ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा गटसचिव पतसंस्थेचे चेअरमन बबन मेहेर, तालुका गटसचिव पतसंस्थेचे चेअरमन अनिल सुरवसे, माजी संचालिका सुप्रियाताई सुरवसे, सचिव विठ्ठल क्षीरसागर यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दत्तकला शिक्षण संस्थेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



करमाळा(सं.प्र.) : दत्तकला शिक्षण संस्थेत भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, सचिव माया झोळ, मधुकरकाका झोळ, प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ.बाबर, सर्व विभागाचे प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कै.साधनाबाई नामदेवराव जगताप शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : नगरपरिषदेच्या कै.साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१ येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमृतसिंग परदेशी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीत सादर केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक दयानंद चौधरी यांनी केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेने हर घर तिरंगा अभियान अंतर्गत स्वातंत्र्य रॅली काढली. या रॅलीत थोर महापुरूषांया वेशभुषेत विद्यार्थी सहभागी झाले होते. सुत्रसंचालन संध्या शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार भालचंद्र निमगिरे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश धर्माधिकारी, सुवर्णा वेळापुरे, सुनीता क्षीरसागर, मोनिका चौधरी, तृप्ती बेडकुते, भाग्यश्री पिसे यांनी परिश्रम घेतले.

करमाळा शहरात स्वातंत्र्याचा ७८ वा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातील नगरपालिका शाळेत, महात्मा गांधी विद्यालय, कमलादेवी कन्या प्रशाला, आण्णासाहेब जगताप विद्यालय, गिरधरदास देवी विद्यालय, डी.जी.पाटील विद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच सर्व शासकीय कार्यालयातही ध्वजारोहण करण्यात आले.

# उमरड येथे नूतन पोलीस अधिकारी व पोलीस भरती झालेल्यांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.) : उमरड येथे नूतन पोलीस उपनिरीक्षक व पोलीस भरती झालेले अन्वय इमाम मुलाणी, कय्युम पठाण, मुनाफ हमीद सय्यद या युवकांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी व पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी माजी सरपंच प्रमोद बदे, तात्यासाहेब सरडे, श्रीमान चौधरी, डी.जी.बदे, साहेबराव मारकड, बापू चोरमले, अनिल सुरवसे, माजी सरपंच संदिप मारकड, देवीदास पाखरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी तांबोळी म्हणाले, की ग्रामीण भागातून खडतर प्रवास करून इतकी मोठी मेहनत घेऊन पोलीस होणं ही फार मोठी गोष्ट आहे. या सर्वांनी आपल्या कार्यात तत्पर राहून नागरीकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा; असे आवाहन केले. प्रास्ताविक व सुत्रसंचालन फोजमल पाखरे यांनी केले.